**MHKO050067912024**

## नियमित दिवाणी दावा क्र. ५१७/२०२४ मधील नि.४१ वरील आदेश

(आप्पा दाभाडे वि. कुमार दाभाडे वगैरे)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी इतर प्रतिवादी यांचेशी संगनमत करुन दावा मिळकत 'ब' ही रजिस्टर दस्त नंबर ७६४५ ने दिनांक १०.१०.२०२५ रोजी बेकायदेशीर दस्ताने विक्री केलेली आहे. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दावा मिळकतीचे कोणतेही व कसल्याही प्रकारे वाटप झालेले नाही. त्यामुळे, वादीस सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. वादीने अर्जात नमुद केले प्रमाणे दावेचे सरनामेत प्रतिवादी नं.११ नंतर प्रतिवादी नं.१२ ते १५ यांना सामील करुन घेणेबाबत तसेच सरनामेत व नंतर दावा कलम ७–अ, ७–ब, ९, १५, १५–ब–२ मध्ये त्या अनुषंगाने दुरुस्ती करणेची मागणी केली आहे. सदरचे दुरुस्ती मुळे दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये बदल होणार नाही. त्यामुळे, अर्जात नमुद केले प्रमाणे दाव्यामध्ये सदरची दुरुस्ती करुन मागितलेली आहे.

३. प्रतिवादी नं. ५ ते १० व प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी सदर अर्जास

हरकत घेऊन आपले म्हणणे अनुक्रमे नि.क्र.४२ व ४३ कडे दाखल केले आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे अर्जाचे स्वरुपामध्ये पुर्णतः बदल होणार आहे. त्यामुळे, वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे पाहिले.

५. संपुर्ण अभिलेखाचे अवलाकेन केले. वादीने सदरच दावा प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाई ताकीद मिळणेसाठीदाखल केला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीबाबत दिनांक १०.१०.२०२५ रोजी खरेदीपत्र झालेचे दिसुन येते आहे. सदरचा दावा हा नि.क्र. ५ वरील युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत वादी व प्रतिवादी यांचेतील वाद कायमस्वरुपी संपुष्टात येणेकरिता आणि वादांची पुर्नरावृत्ती टाळणेकरिता वादी मागत असलेली दुरुस्ती मंजुर केलेस प्रतिवादींना काहीही त्रासाचे होणार नाही. उलट, सदरची दुरुस्ती ही अंतिम न्यायनिर्णयास मदत करणारी आहे. सदरचे दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. वादीने सदरचा अर्ज विलंबाने का दिला याबाबतचे कोणतेही संयुक्तीक कारण अर्जामध्ये नमुद केलेले नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज वादी यांचेवर खर्च देवविणेच्या अटीवर मंजुर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी या अर्जाचा खर्च रक्कम रुपये ३००/- प्रतिवादीनां द्यावेत.

३.	वादींनी सदर आदेशापासून १४ दिवसाचे आत अगर पुढील नेमले तारखेस दाव्यात दुरूस्ती करून तशी दुरूस्ती दावा प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2026.07.02 17:49:26 +0530

**इचलकरंजी.** **(जी.एम. नदाफ)**

**दिनांक – ०२.०७.२०२६.** **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,**

**इचलकरंजी.**